ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून संविधानिक मूल्यांची रुजवणूक : एक चिकित्सक अभ्यास

** श्री. सचिन दिलीप अहिरे,*

** विद्यावाचस्पती संशोधक, मु. पो. केरसाणे ता. बागला, नाशिक - ४२३३०१*

**प्रस्तावना :**

सामाजिक न्याय आणि समानता साध्य करण्यासाठीचे एकमेव सर्वोत्तम साधन म्हणजे शिक्षण होय. सर्वसमावेशक आणि यथायोग्य शिक्षण, हे एक अत्यावश्यक उद्दिष्ट तर आहेच, शिवाय अशा एका सर्वसमावेशक आणि न्याय्य समाजाची स्थापना करण्यासाठी देखील ते आवश्यक आहे, ज्यात प्रत्येक नागरिकाला स्वप्ने पाहण्याची, प्रगती करण्याची आणि राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावण्याची संधी मिळेल. भारतीय मुलांना लाभ होणे हे शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. म्हणजे कोणत्याही मुलास जन्म किंवा परिस्थितीमुळे शिकण्याची आणि चमक दाखविण्याची संधी गमवावी लागणार नाही. हे धोरण या गोष्टीची पुन्हा एकदा पुष्टी करते की, शालेय शिक्षणामध्ये प्रवेश, सहभाग आणि अध्ययन निष्पत्तीमधील सामाजिक श्रेणीची दरी कमी करणे हे शिक्षण क्षेत्रातील सर्व विकास कार्यक्रमांचे एक प्रमुख लक्ष्य असेल. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता ही मूल्य रुजवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा नवीन शैक्षणिक धोरणाचा गाभा आहे.

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्या राष्ट्रात अस्तित्वात असलेल्या शिक्षण पद्धतीचा वाटा हा अत्यंत महत्वाचा असतो. शिक्षण पद्धती नुसारच त्या राष्ट्राची प्रगती किंवा अधोगती झालेली आपल्याला जगाच्या इतिहासाकडे पाहिल्यानंतर लक्षात येते. प्राचीन ग्रीक नगर राज्ये, ब्रिटन, यांच्या विकासाला कारणीभूत त्यांनी स्वीकारलेले शिक्षण पद्धती त्यातून निर्माण झालेले नागरिक आहेत. हे सहजपणे समजून येते.

सन १९४७ साली भारत स्वतंत्र्य झाला. त्यापूर्वी भारतात ब्रिटीशांची सत्ता होती. भारतात शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने लॉर्ड मेकॉले पध्दतीचा अवलंब करण्यात आला होता. इंग्रजांना भारताचा कारभार पाहण्यासाठी आणि देश चालविण्यासाठी कारकुनी वर्ग हवा होता. त्या दृष्टीने त्यांनी भारतात शैक्षणिक धोरणानुसार ब्रिटिशांनी इंग्लंडच्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाची अंमलबजावणी केली व त्यानुसार सुधारणा करण्यात आल्या.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांप्रमाणेच शिक्षण ही माणसाची गरज बनली आहे. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो. अनेक ऋषीमुनींनी गुरुकुल पध्दतीने शिक्षण घेऊन विद्वान बनले. ज्ञान साधना करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्टे होते. देशाच्या विकासासाठी काळानुरूप शिक्षण देणे आवश्यक बनले आहे. नवे शैक्षणिक धोरण २०२० हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता, संविधानिक मूल्यांची रुजवणूक, संविधानिक मूल्यांचा विकास आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाच्या समस्यांचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेतील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे.

भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. कोविड महामारीच्या काळात जलद पावले उचलून अवघड निर्णय घेऊन ते पूर्तीस नेण्याचे कौशल्य केंद्राने दाखवले आहे. याच कौशल्याचा फायदा शिक्षण क्षेत्रातही होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली आहे तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टे:-**

१. नवीन शैक्षणिक धोरणाची भूमिका समजून घेणे.

२. नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या संरचनेचा अभ्यास करणे.

३. नवीन शैक्षणिक धोरणाच्या विविध तत्त्वांचा अभ्यास करणे.

४. नवीन शैक्षणिक धोरणाचा दृष्टीकोन समजून घेणे.

५. नवीन शैक्षणिक धोरणापुढील आव्हानांचा अभ्यास करणे.

६. बदलत्या नवीन शैक्षणिक धोरणाचा पॅटर्न समजावून घेणे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन लेखासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केलेला आहे. दुय्यम साधनसामग्रीमध्ये विविध तज्ञांचे लेख, शोधनिबंध, लाघुशोध निबंध, मासिके, वर्तमानपत्रे , इंटरनेट, सरकारी स्रोत, बेवसाइट आणि विविध जर्नल्स इ. दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला आहे. सदर माहितीचा वापर करून विश्लेषण केले व निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे काय ?**

"शिक्षणाचा प्रचार प्रसार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने तयार केलेले धोरण म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण होय."

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

**नवीन शैक्षणिक धोरणाचा इतिहास :**

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे २१ व्या शतकातील पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' आहे. NEP Full Form 'National Education Policy 2020 (NEP 2020 ) असा आहे. तब्बल ३४ वर्षानंतर 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' NEP 2020 २९ जुलै 2020 रोजी मंजूर करण्यात आले. या धोरणामध्ये अनेक अमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय' आता 'शिक्षण मंत्रालय' या नावाने ओळखण्यात येणार आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरिकांची निरक्षरता दूर करण्यासाठी सातत्याने वेगवेगळे कार्यक्रम आखले जात आहे. त्यामध्ये सुरुवातीला विविध शिक्षण आयोग नेमण्यात आले होते.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७३ वर्षे पूर्ण झाली. या जवळपास ७० दशकांच्या काळात आणि भारत स्वतंत्र होण्याच्या आधीच्या काळात अनेक शिक्षण आयोग नेमले गेले. यात १८५४ चा वूड्स अहवाल, १८८२ चा हंटर अहवाल, १९०२ चा रेली आयोग अजूनही बरेच काही यानंतर भारत स्वतंत्र झाल्यानंतर पुढील प्रमाणे आयोग नेमण्यात आले.

१. ताराचंद समिती : इ.स. १९४८ साली नेमण्यात आलेल्या या समितीने बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालयांची शिफारस केली व माध्यमिक शिक्षणव्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी आयोग नेमण्याचे सुचविले.

२. आचार्य नरेंद्रदेव समिती इ.स. १९५२ साली नेमण्यात आलेल्या समितीने बहुउद्देशीय शाळांची शिफारस केली.

३. मुदलियार आयोग इ.स. १९५२ साली डॉ. लक्ष्मणशास्त्री मुदलियार यांच्या अध्यक्षते खाली नेमलेल्या आयोगाने (४/५+३/२+४+१+३=१५) असा आकृतिबंध सुचवला.

४. कोठारी आयोग इ.स. १९६४ साली डॉ. एस. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोग नेमण्यात आला. या आयोगाने मॉन्टेसरी शिक्षण सोडून (१०+२+३ = १५) अशी योजना मांडण्यात आली. इ.स. १९६८ साली शासनाने शैक्षणिक धोरण प्रसिद्ध केले आणि सर्व राज्यांनी १०+२+३ हा आकृतिबंध स्वीकारावा असे सुचविले. इ.स. १९७७ साली ईश्वरभाई पटेल समिती व इ.स. १९७८ साली आदिशेषय्या समितीने शिक्षणाचे व्यावसायीकरण कसे करता येईल यासंदर्भात शिफारशी केल्या.

५. १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २० एप्रिल १९८६ रोजी केंद्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रसिद्ध केले. त्यात १०+२+३ या आकृतीबंधाचाच पुनरुच्चार केला.

यांसारखे विविध आयोग आले त्यांनी या शिक्षण व्यवस्थेत नेमके कोणते बदल आवश्यक आहेत याबद्दल विवेचन करून सरकार कडे मसुदा तयार करून दिला. नुकतेच इस्रोचे माजी संचालक व विख्यात अंतराळशास्त्रज्ञ डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने काही बदल सुचवलेले होते. या बदलाचे फलित म्हणजे नवे शैक्षणिक धोरण २०२०

होय. नवे शैक्षणिक धोरण हे भविष्याचावेध घेणारे असेल आणि ही शिक्षण पद्धती भारतीयांनी इतिहासात केलेल्या अभूतपूर्व कामगिरीचा परिचय करून देईल आणि भविष्याचा वेध घेऊन उभारी घेईल.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे :-**

१. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे.

२. शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे व नवनवीन उपक्रम राबविणे.

३. इसवी सन २०२५ पर्यंत पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे.

४. ज्ञानावर व सर्व प्रकारच्या समानतेवर आधारित समाज निर्माण करणे.

**भारतीय उच्च शिक्षण प्रणालीतील समस्या :**

भारतातील उच्च शिक्षण प्रणाली सध्या ज्या प्रमुख समस्यांचा सामना करत आहे त्यात खालील समस्यांचा समावेश आहे:

१) अतिशय विखुरलेली उच्च शैक्षणिक परिसंस्था.

२) आकलन कौशल्याचा विकास आणि अध्ययनाच्या निष्पत्तीवर कमी भर.

३) शैक्षणिक शाखांची साचेबंद पध्दतीने विभागणी, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना खूप लवकर एका विशिष्ट विषयाची/शाखेची निवड करायला लागते आणि अध्ययनाच्या संकुचित क्षेत्राकडे वळवले जाते.

४) मर्यादित उपलब्धता विशेषतः सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित क्षेत्रांमध्ये, जिथे स्थानिक भाषेत शिकवणारे अतिशय कमी HEIs उपलब्ध आहेत.

५) गुणवत्तेवर आधारित करिअर व्यवस्थापन आणि शिक्षक व संस्थेच्या प्रमुखांची प्रगती, यासाठी अपुरी यंत्रणा.

६) मर्यादित शिक्षक आणि संस्थात्मक स्वायत्तता.

७) बहुतांश विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये संशोधनावर कमी भर, आणि शाखांमध्ये स्पर्धात्मक सहाध्यायी-परीक्षण संशोधन निधीचा अभाव.

८) HEIs मध्ये शासन आणि नेतृत्वाचा अभाव.

९) अपरिणामकारक नियामक व्यवस्था.

१०) अनेक संलग्न विद्यापीठे अस्तित्वात असल्यामुळे पदवीपूर्व शिक्षणाचा खालावलेला दर्जा.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

**भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेचे नूतनीकरण :**

या आव्हानांवर मात करण्यासाठी, उच्च शिक्षण व्यवस्थेचे नूतनीकरण करून तिला नवी ऊर्जा प्रदान करणे आणि त्याद्वारे समता आणि सर्वसमावेशक असे उच्च-गुणवत्तेचे उच्च शिक्षण प्रदान करणे, या धोरणात संकल्पित आहे. धोरणाच्या दूरदृष्टीमध्ये सध्याच्या व्यवस्थेमध्ये खालील मुख्य बदलांचा समावेश आहे.

१) अशा उच्च शैक्षणिक व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करणे, ज्यात प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास किमान एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ आणि महाविद्यालयाचा समावेश असेल आणि संपूर्ण भारतभरात अशा अनेक HEI असतील ज्यांचे शिकवण्याचे किंवा कार्यक्रमांचे माध्यम स्थानिक/भारतीय भाषा असेल.

२) अधिक बहुशाखीय पदवीपूर्व शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे.

३) अध्यापकीय आणि संस्थात्मक स्वायत्ततेच्या दिशेने वाटचाल करणे.

४) विद्यार्थ्यांना अधिक चांगला अनुभव मिळण्यासाठी अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र, मूल्यांकन आणि विद्यार्थी साहाय्य यांमध्ये सुधारणा करणे.

५) अध्यापन, संशोधन आणि सेवा यांवर आधारित नेमणूक आणि करिअर प्रगतीद्वारे शिक्षकांच्या आणि संस्थात्मक नेतृत्वाच्या सचोटीची पुष्टी करणे.

६) सहाध्यायींनी पुनरावलोकन केलेल्या संशोधनाला अर्थसहाय्य करण्यासाठी आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये सक्रियपणे संशोधन रुजवण्यासाठी राष्ट्रीय संशोधन संस्थेची (नॅशनल रिसर्च फाऊंडेशन) स्थापना करणे.

७) शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता असलेल्या उच्च पात्रताधारक स्वतंत्र मंडळांमार्फत HEI चे शासन.

८) उच्च शिक्षणासाठी एकाच नियामकाद्वारे "सुलभ पण परिणामकारक" नियमन.

९) उत्कृष्ट सार्वजनिक शिक्षणाच्या मोठ्या संधींसारख्या अनेक उपायांद्वारे अधिक उपलब्धता, समानता आणि सर्वसमावेशकता; उपेक्षित व वंचितांसाठी खासगी / धर्मादाय विद्यापीठांद्वारे शिष्यवृत्याः ऑनलाईन शिक्षण व मुक्त दूरस्थ शिक्षण (ODL); आणि सर्व पायाभूत सुविधा व शिक्षण साहित्याची उपलब्धता.

**नवीन शैक्षणिक धोरणातील ठळक मुद्दे :**

१. शिक्षण क्षेत्रासाठी जीडीपीच्या ६ टक्के एवढा खर्च केला जाईल, या अगोदर ३.५ टक्के खर्च होत होता.

२. २०२४ पर्यंत भारत सरकारचे सर्व उच्च शिक्षण संस्था यांना बहुउद्देशीय संस्था बनवण्याचे लक्ष्य आहे आणि या प्रत्येकी संस्था मध्ये ३००० किंवा त्यापेक्षा जास्त विद्यार्थाचे लक्ष्य असेल,

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

३. एन इ पी चे २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास कमीतकमी एक मोठी बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्याचे उददिष्ट आहे.

४. सध्याची १०+२+३ रचना बदलून नवीन ५+३+३+४ मध्ये सुधारित केली जाईल. त्यामध्ये ३ ते १८ वर्षा च्या नवीन शैक्षणिक आणि अभ्यासक्रमाच्या पुनरर्चनाद्वारे सुधारित केली जाईल. ३ ते ६ वयापर्यंत अंगणवाडी, ६ ते ८ वर्ष क्लास १ आणि क्लास २ ८ ते ११ वर्ष क्लास ३ ते ५ वय ११ ते १४ पर्यंत क्लास ६ ते ८ आणि ११ ते १८ वय क्लास ९ ते १२ असे असेल.

५. २ ते ३ वयोगटातील मुलांना पायाभूत दर्जा मानला जाईल आणि ते प्ले स्कूल आणि ग्रेड १ आणि माध्यमिक श्रेणी ९ ते १२ असा समावेश असेल.

६. इंग्रजी व हिंदी सोडून मुलांना शिकवताना एकाच भाषेचा उपयोग न करता बहुभाषिक शिक्षणामध्ये विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार.

७. मल्टिपल एन्ट्री आणि एग्झिट सिस्टम चा उपयोग करण्यात येणार आहे. काही कारणामुळे ज्या विध्यार्थांना आपले शिक्षण पूर्ण करता येत नाही त्यांच्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये मल्टिपल एन्ट्री आणि एग्झिट सिस्टम चा समावेश केला आहे. त्यामध्ये एका वर्षानंतर सर्टिफिकेट, दोन वर्षानंतर डिप्लोमा सर्टिफिकेट आणि तीन-चार वर्षानंतर डिग्री सर्टिफिकेट मिळेल.

८. अपंग विध्याथांसाठी फ्री एज्युकेशन असेल.

९. शाळा स्तरावर व्यावसायिक अभ्यासावर जास्त लक्ष केंद्रित केले जाईल. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षकांना ही ट्रेनिंग सुविधा देण्यात येईल. शाळेच्या वेळे नंतर प्रौढांच्या शैक्षणिक कोर्स साठी शाळेच्या इमारती वापरल्या जातील.

१०. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थासाठी जवाहर नवोदय विद्यालयामध्ये मोफत बोर्डिंग सुविधा.

११. भारतीय संकेत भाषा शिकण्यासाठी एनआयओएस (NIOS) उच्च गुणवत्तेचे मोड्युल विकसित करेल.

१२. एससी, एसटी, ओबीसी आणि इतर एसईडीजीतील विद्यार्थाच्या गुणवत्तेस उत्तेजन देण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल वाढविण्यात येईल.

१३ . कला, विझ, क्रीडा आणि इतर व्यावसायिक हस्तकला यासाठी वर्षभर बँगलेस दिवसांना प्रोत्साहित केले जाईल.

१४. २०३० पर्यंत अध्यापन पात्रतेसाठी किमान पदवी ४ वर्ष इंटेग्रेटेड असली पाहिजे.

१५. लॉ आणि मेडिकल शिक्षण सोडून उच्च शिक्षण हे एका छताखाली घेता येणार आहे..

१६. महाविद्यालय प्रवेशासाठी एकच एन टी ए हे परीक्षा घेण्यात येईल, ही परिक्षा ऐच्छिक असेल.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

१७. केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच नाव बदलून शिक्षण मंत्रालय असं होणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये उच्च शिक्षणाच्या बाबतीतही अनेक बदल करण्यात आले आहे. अंडरग्रॅज्युअट कोर्स ३ ते ४ वर्षाच्या लवचिक अभ्यासक्रमासह एकाधिक एक्झिट ऑप्शनसह आणि वेगवेगळ्या स्तरावर प्रमाणपत्रासह दिले जातील. बारावीच्या परीक्षेला बोर्डाचा दर्जा असेल. १३ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळेल. १४ वी पास करणार्या विद्यार्थ्यांस पदवीका म्हणजेच डिप्लोमाचे प्रमाणपत्र मिळेल व १५ वी पास विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळेल व यावर त्यांना नोकरीच्या शिफारशीस फायदा होणार आहे.

उच्च शिक्षण हे या नवीन धोरणानुसार आंतरविद्याशाखीय शिक्षण झाले आहे. यात प्रत्येक विद्यार्थ्याला विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. विज्ञान, कला, वाणिज्य, अभियांत्रिकी या विषय विभागणीतून तयार झालेल्या भिंती मोडीत काढून विद्यार्थ्यांना विषयनिवडीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संगीत विषयाची आवड असल्यास तो तो विषयही घेऊ शकतो. चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली तर त्या डायरेक्ट पीए. एच. डी साठी प्रवेश घेता येऊ शकतो. त्याला एम. फील. पेट परीक्षा देण्याची गरज नाही. म्हणजेच प्रमाणपत्र, पदवीका आणि पदवी या प्रमाणे शिक्षण पूर्ण केलेला विद्यार्थी पीएच. डी.स पात्र होऊ शकतो.

चार वर्षांची पदवी पूर्ण करणारा विद्यार्थी असेल तर त्याला फक्त एक वर्षाचा पदव्यूत्तर अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे आणि ज्या विद्यार्थ्यांने तीन वर्षांची पदवी पूर्ण केली त्यासाठी २ वर्षाचा पदव्यूत्तर अभ्यास पूर्ण करावा लागेल. म्हणजेच जर तीन वर्षाची पदवी पूर्ण केली तर २ वर्ष एम. ए. करावे लागेल व २ वर्षांची पदवी पूर्ण केली तर एक वर्षच एम. ए. पूर्ण करावे लागेल.

**नवीन शैक्षणिक धोरणाची आशास्थाने :**

१) उच्च शिक्षणात ज्ञानदान आणि संशोधनावर भर असेल.

२) उच्च शिक्षणात संशोधनासाठी किंवा उच्च शिक्षणासाठी विदेशातील विद्यापीठे आणि संशोधकांशी समन्वय साधून काम करण्यासाठीचे स्वातंत्र्य महाविद्यालयांना देण्यात आले आहे.

३) आर्थिक व अन्य सुविधांसाठीच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल.

४) वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विद्यार्थीमध्ये विकसित होण्यास मदत मिळेल.

**नवीन शैक्षणिक धोरणाशी संबंधित शिफारशी :**

१) नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांच्या पदोन्नतीची व्यवस्था कामगिरीच्या आधारे करण्यात येईल.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

२) शिक्षकांसाठी व्यावसायिक मानक 'राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद विकसित करेल.

३) २०३० पर्यंत नवीन धोरणांची अंबलबजावणी करणे.

४) दिव्यांग मुलांसाठी विशेष तरतूद केली आहे.

५) प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्वांचा सहभाग व बळकटीकरणाकडे विशेष लक्ष पुरवले जाईल.

६) सध्या ४.४३ टक्के असणारा जीडीपी ६ टक्क्यापर्यंत वाढ करण्यात येणार आहे.

७) SC, ST, OBC आणि इतर विशिष्ट वर्गातील विद्यार्थांना प्रोत्साहित केले जाईल. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार केला जाईल.

२१ व्या शतकातील गरजा ओळखून भारताला एक मजबूत राष्ट्र बनविण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या अद्वितीय क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने तसेच इंग्रजी शिक्षणात बदल करून स्वदेशी शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० समोरील आव्हाने:**

१. प्रत्येक मुलाची क्षमता ओळखणे आणि विकसित करणे.

२. मुलांमध्ये साक्षरता आणि संख्याशास्त्राचे ज्ञान विकसित करणे.

३. बहुभाषेमुळे मातृभाषेला महत्व वाढल्यामुळे एकाच भाषेचा प्रभाव वाढेल.

४. मूल्यमापनावर भर.

५. शालेय अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रातील सुधारणा.

६. न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षणाकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे.

७. ऑनलाइन शिक्षण आणि डिजिटल शिक्षण उपलब्ध करून देणे .

८. भारतात अनेक भाषा आल्यामुळे प्रत्येक भाषांचे संवर्धन करणे एक मोठे आव्हान ठरणार आहे .

९. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार व्यावसायिक शिक्षण देणे हे एक मोठे आव्हान असेल.

१०. शिक्षणात नवीन तंत्रज्ञानाची गरज.

११. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार व्यावसायिक शिक्षण देणे हे एक मोठे आव्हान.

१२. बाहेरील विद्यापीठांचे महत्व वाढेल.

**निष्कर्ष**:

नवीन शैक्षणिक धोरण अधिक यशस्वी होण्यासाठी भारतीय सामाजिक परिस्थितीचा विचार करता पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

१. शैक्षणिक क्षेत्रात आर्थिक गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे.

२. शिक्षणाच्या खाजगी करण्याबरोबरच काही सरकारी शिक्षण संस्था ही स्थापन करणे आवश्यक आहे.

३. आर्थिक दृष्ट्या मागास तसेच ग्रामीण भागातील जनता शिक्षणापासून दूर जाऊ नये याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांमध्ये वैश्विक मानवी भारतीय संविधानिक मूल्य रुजविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कोणतेही धोरण पूर्णतः आदर्श नसतेच. मात्र अनेक समाज घटकांचे चर्चा करून अभ्यासपूर्ण धोरण आखण्याचा प्रयत्न झालेला आहे. केवळ पाठांतराला व स्मरणशक्तीला महत्त्व देणाऱ्या पारंपारिक शिक्षणाकडून कौशल्य निर्मिती व क्षमता निर्माण करणाऱ्या शिक्षणाकडे वळण्याची संधी २०२० च्या नव्या शैक्षणिक धोरणाने मिळवून दिली आहे. माहिती तंत्रज्ञान कौशल्य व संशोधनास चालना देणाऱ्या अनेक शिफारशींचा समावेश या धोरणात आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षणास जोडले जाणार आहे.

विद्यार्थ्यांवरील बौद्धिक ताण कमी होऊन संकल्पना स्पष्ट करणारे आनंददायी शिक्षण मिळणार आहे. केवळ बौद्धिक विकासाऐवजी सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक, संविधानिक मूल्य रुजविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. विद्यार्थ्यांचे व्यापक व सर्वांगीण मूल्यमापन होणार आहे. साचेबंदपणा जाऊन आवडीनुसार शिक्षणाचे तत्व अमलात येणार आहे. शिक्षण हक्क संकल्पना अधिक व्यापक होऊन अठरा वर्षापर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण मिळणार आहे.

**समारोप :**

नव्या शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आंतराष्ट्रीय विद्यापीठांना भारतीय विद्यापीठांशी जोडले जाणे हा देखील आहे. हा उद्देश सफल होण्यासाठी शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीतून मूल्याधिष्ठित, कार्यक्षम, कौशल्याधिष्टीत विद्यार्थी तयार होणे अपेक्षित आहे. असे झाल्यास परदेशातील विद्यापीठात शिक्षणाच्या अनेक संधी भारतीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतील. संगणकाच्या वापराने विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक चांगले व्हावे, यासाठी गेली अनेक दशके संशोधन व प्रयोग चालू आहेत. परंतु कोरानाने संगणक आधारित शिक्षणाला चांगलीच गती दिली आणि संपूर्ण जगभर मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन शिक्षणप्रणाली रुजवण्यास मदत केली. नव्या शैक्षणिक धोरणातही वर्गातील शिक्षणप्रक्रिया सुधारण्यासाठी, अध्ययन प्रक्रियेत शिक्षकांना सहायभूत ठरण्यासाठी, शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन सुसूत्रबद्ध करण्यासाठी शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाच्या वापरास विशेष महत्त्व दिले गेले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणात फक्त बदल आणि सूचनाच नसून त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूददेखील करण्यात आली आहे. आजपर्यंतच्या शिक्षणावर जीडीपीच्या तीन टक्के खर्च होत होता. येणाऱ्या काळात यात

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I JAN – FEB 2024

Original Research Article

वाढ करून हा खर्च सहा टक्क्यांपर्यंत करण्याचा निर्णय नव्या धोरणात घेतला गेला आहे. या व्यतिरिक्त खाजगी क्षेत्रातूनही मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध व्हावा यासाठी विशेष योजना राबविल्या जाणार आहेत.

**संदर्भ सूची :**

1) इंटरनेट - गुगल

2) मासिक - शिक्षण संक्रमण

3) वर्तमानपत्र - सकाळ, लोकमत, गावंकरी

4) शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवे शैक्षणिक धोरण २०२० कायदा, २०२०

5) डॉ. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधनपद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७

6) कुंटे श्रीकृष्ण, नवीन शैक्षणिक धोरण २०२०', स्नेहल प्रकाशन, पुणे, २०२३

7) प्रा. डॉ. विभूते भालबा, राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२०-चिकित्सा, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, २०२२

8) डॉ. देशमुख लक्ष्मीकांत, 'नवे शैक्षणिक धोरण: एक चिकित्सक अभ्यास' आंतरभारती, पुणे, २०२१

9) शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवे शैक्षणिक धोरण २०२० कायदा, २०२०

*Cite This Article:*
*श्री. अहिरे स. द.* (2024). *नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून संविधानिक मूल्यांची रुजवणूक : एक चिकित्सक अभ्यास.*
In Educreator Research Journal: Vol. XI (Number I, pp. 290–299).
**ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10730625